ePaper
केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पिंपरी चिंचवड दौऱ्यावर, पोलिसांचा चोख बंदोबस्त

| वर्ष - 7 । अंक - 96 | UDYAM-MH-26-0158827 |


# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार , दिनांक 6 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- भारत-जपान सामना 1-1 ने अनिर्णित
- अरबाजच्या पार्टीत सलमान
- दिल्ली हादरली : भूकंपाचे तीव्र धक्के
- शरद पवारांना जबर धक्का ?


# पर्यावरण संवर्धनाचा ‘माईल स्टोन’!

## ›› ‘पिंपरी-चिंचवड मॉडेल’चा बोलबाला : प्रकल्पांना राज्य-परराज्यातील शिष्टमंडळाच्या भेटी

।पिंपरी । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी


**पर्यावरण संवर्धन आणि ‘ग्रीन सिटी’ या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड महापालिका पर्यावरण विभागाने विविध पथदर्शी प्रकल्प हाती घेतले आहेत. ‘वेस्ट टू एनजी’ अर्थात कचऱ्यापासून वीजनिर्मिती या प्रकल्पाचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते लोकार्पण झाल्यानंतर ‘पिंपरी-चिंचवड मॉडेल’ची चर्चा राज्यात जोर धरू लागली आहे. त्यामुळे पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे यांसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शिष्टमंडळांचा शहरात दौरा वाढला असून, असे प्रकल्प त्या-त्या शहरांमध्ये उभारण्याकरिता प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत.**



शहरांचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे कचरा, पाणी आणि पर्यावरण या समस्या भेडसावत आहेत. १९८२ मध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना झाली. त्यावेळी शहराची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाख इतकी होती. आजच्या घडीला शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. सन १९९९ मध्ये महापालिकेत मोशी गावचा समावेश करण्यात आला. तत्पूर्वी, शहराच्या स्थापनेपासून या गावातील मोकळ्या जागेवर कचरा टाकला जात होता. १९९२ मध्ये अधिकृतपणे मोशी कचरा डेपोची घोषणा करण्यात आली. कचऱ्याचे डोंगर उभा राहिले. दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्यांचा परिसरातील नागरिकांना सहन करावा लागला. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका पर्यावरण विभागाने ‘वेस्ट टू एनर्जी’ म्हणजेच कचऱ्यापासून वीज निर्मिती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा प्रस्ताव तयार केला. महाराष्ट्रातील पहिलाच प्रकल्प असल्यामुळे या संकल्पनेला सुरूवातील प्रचंड विरोध झाला. कचऱ्यापासून वीज निर्मिती हा मुद्दाच शहरातील अनेक लोकप्रतिनिधी, पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या लक्षात आली नाही. प्रशासकीय आणि राजकीय आव्हानांचा सामना करीत हा प्रकल्पाची पायाभरणी २०१८ मध्ये झाली. या प्रकल्पाचे लोकार्पण झाले. यामाध्यमातून प्रतिदिन १ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार असून, त्याद्वारे १४ मेगावॅट इतकी वीज उपलब्ध होईल. ही वीज कमी दरामध्ये महापालिक प्रशासनाला वापरासाठी मिळणार आहे. यातून महापालिकेच्या वीज खर्चातील आर्थिक बचत होणार आहे.



**“ वाढती लोकसंख्या आणि कचरा, पाणी या समस्यांवर प्रगत राष्ट्रांमधील तंत्रज्ञानाच्या अधारे कायमस्वरुपी उपायोजना करणे काळाची गरज आहे. आयुक्त शेखर सिंह, पूर्व आयुक्त श्रावण हर्डिकर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘वेस्ट टू एनर्जी’ हा प्रकल्प पूर्णत्वास नेता आला. पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी या प्रकल्पाचे स्वागत केले. महाराष्ट्रातील हा पहिला प्रकल्प असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते लोकार्पण झाले. त्यामुळे अन्य मोठ्या शहरातील शिष्टमंडळ वेस्ट टू एनर्जीसह अन्य प्रकल्पांनाही भेट देत आहेत. ही बाब समाधानकारक आहे.**
**– संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग.**



आता पुण्यातील कार्यक्रमामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्पाचे लोकार्पण झाले. गेल्या अनेक दिवसांपासून हा प्रकल्प प्रसिद्धीच्या झोतात आहे. शहराच्या विकासात हा प्रकल्प ‘माईल स्टोन’ ठरला आहे. त्यामुळे राज्यातील आणि परराज्यातील मोठ्या शहरांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांची शिष्टमंडळांचा या प्रकल्पाची पाहणी आणि कार्यप्रणाली जाणून घेण्यासाठी ओढा वाढला आहे.

## ‘ग्रीन सिटी’ चे शिल्पकार संजय कुलकर्णी...

»पिंपरी-चिंचवड महापालिका पर्यावरण विभागाचे प्रमुख तथा सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या पुढकाराने शहरात पर्यावरण संवर्धनाला चालना देणारे विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. यामध्ये बायोमायनिंग, सी एन्ड डी वेस्ट, सेबर प्रकल्प सीईटीपी, एसटीपी असे विविध प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. कचऱ्याचे डोंगर कमी करण्यासाठी बायोमायनिंग प्रकल्प राबवण्यात आला. त्याआधारे पहिल्या टप्प्यात ५ मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावली असून, पुढच्या टप्प्यात आणखी ३ मॅट्रिक टन कचरा जिरवण्यात येणार आहे. एमआयडीसी भागातील सांडपाणी थेट नदी पात्रात न सोडता त्यावर ‘सेबर प्रकल्प’ कार्यान्वयीत केला आहे. त्यामुळे रसायनमिश्रीत पाणी नदी पात्रात जात नाही. परिणामी, नदी संवर्धनासाठीही प्रशासन पुढाकार घेत आहे. ‘गीन सिटी क्लिन सिटी’ या हेतूने काम करणारे संजय कुलकर्णी या भविष्यातील ‘ग्रीन सिटी पिंपरी-चिंचवड’ चे शिल्पकार ठरले आहेत.

# पुणेकरांची दिवसभर वाहतूककोंडी!

## अमित शहा यांचा दौरा : सिग्नल यंत्रणा कोलमडली

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील प्रमुख चौकांतील सिग्नल यंत्रणा सकाळी बंद पडल्याने दिवसभर वाहतुकीची कोंडी झाली असताना, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे रात्री शहरात आगमन झाल्यानंतर वाहतुकीचा बोजवारा उडाला. सिग्नल यंत्रणा कोलमडल्याने आणि शहा यांच्या दौऱ्यामुळे वाहतुकीत बदल करावा लागल्याने पुणेकरांची दिवसभर वाहतूककोंडी झाली.**

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यामुळे वाहतुकीत बदल



शहरातील प्रमुख चौकांतील सिग्नल यंत्रणा शनिवारी दुपारी बंद पडली. सुटी असल्याने रस्त्यावर गर्दी होती. अनेक जण सहकुटुंब मोटार घेऊन बाहेर पडले होते. शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, शास्त्री रस्ता, कर्वे रस्ता परिसरातील प्रमुख चौकांतील सिग्नल यंत्रणा बिघाडामुळे बंद पडली. त्यामुळे प्रमुख रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली. वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. प्रमुख रस्त्याला लागून असणाऱ्या गल्ली-बोळात कोंडी झाली होती. मध्य भागातील प्रमुख चौकातील सिग्नल यंत्रणा बंद पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांनी प्रयत्न केले, अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली. शनिवारी अनेकजण खरेदीसाठी बाहेर पडतात. पावसामुळे मोठ्या संख्येने मोटारी रस्त्यावर आल्याने वाहतूक विस्कळीत झाली. सिग्नल यंत्रणा सायंकाळी कार्यान्वित झाल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. पावसामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग संथ झाल्याने ठिकठिकाणी कोंडी झाली.

### पोलिसांचा मोठा बंदोबस्त

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा रविवारी (६ ऑगस्ट) पिंपरी-चिंचवड शहरातील एका कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. ते शनिवारी रात्री शहरात दाखल झाले. सेनापती बापट रस्त्यावरील एका तारांकित हॉटेलमध्ये त्यांचा मुक्काम आहे. शहा यांचे आगमन झाल्यानंतर सेनापती बापट रस्ता परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. त्यानंतर सायंकाळी ते बिबवेवाडी येथील एका खासगी कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. त्यामुळे वाहतूककोंडीत आणखी भर पडली.

# मोफत दंत तपासणी शिबिर!

## कविता भोंगाळे युवा मंच तर्फे उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी येथे भाजपाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा महिला मोर्चा व कविता भोंगाळे युवा मंचच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये 500 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करण्यात आली.**



तसेच योग्य उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज व हॉस्पीटलच्या प्रशिक्षित तज्ज्ञांकडून ही तपासणी करण्यात आली. यावेळी भाजपा महिला मोर्चा सरचिटणीस कविता भोंगाळे म्हणाल्या की, बदलत्या आधुनिक जीवनशैली व जंक फूडमुळे लहान मुलांचे दात खराब होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे.

त्यामुळे योग्य त्या वेळेला निदान होवून मुलांना अशा जंक फुडपासून परावृत्त केल्यास त्यांचे दात निरोगी राहतील. याच सामाजिक भावनेने हे शिबिर आयोजित केलेले आहे.

आगामी काळात भोसरी, दिघी परिसरातील सर्व शालेय विद्यार्थीनीची दंत तपासणी कविता भोंगाळे युवा मंचच्या माध्यमातून मोफत केली जाणार आहे. अशा शिबिरांचा पालकांनी शाळांनी लाभ घेत आपल्या विद्यार्थांची दंत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन कविता भोंगाळे यांनी केले.

### 500 विद्यार्थ्यांची तपासणी

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज व हॉस्पीटलचे डॉ. तृप्ती जाधव, डॉ. स्वरांजली रामकर, डॉ. स्वमन खरात आदींनी मेहनत घेतली. तसेच यावेळी श्रमजीवी विद्यालयाचे मुख्याध्यापक राक्षे माध्य प्रभारी मुख्याध्यापक निवडुंगे, सर्व शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीकांत राहणे यांनी सूत्रसंचालन केले. राहुल ताकमोडे यांनी आभार मानले.

# 'बाल विकास' कार्यशाळेचे आयोजन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

ॲटो क्लस्टर, चिंचवड येथे रविवार दि. ६ ऑगस्ट 2023 रोजी सकाळी ९.30 ते दुपारी 2 या वेळेत डॉक्टरांसाठी 'बालविकास' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कोरोनानंतर लहान मुलांच्या शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, विकासात येणाऱ्या विविध अडचणी तसेच स्वमग्नतेचा प्रादुर्भाव व त्यावर सर्वोत्तमतम उपचार करण्यास डॉक्टरांना सहाय्यभूत ठरणारी ही कार्यशाळा असणार आहे.

कोरोना नंतर लहान मुलांच्या शारिरिक, मानसिक शौक्षणिक विकासात येणाऱ्या विविध अडचणी तसेच स्वमग्नतेचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन त्यावर सर्वोत्तम उपचार करण्यास डॉक्टरांना सहाय्यभूत ठरणारी ही कार्यशाळा ठरणार आहे. या कार्यशाळेत या विषयांसंदर्भात विशेष अभ्यास असलेले तज्ज्ञ डॉक्टर्स मार्गदर्शन करणार आहेत.




ही कार्यशाळा विनामूल्य असून, भविष्यात बालविकास संदर्भात उपयुक्त ठरेल.

या कार्यशाळेत डॉ. अर्चना कवडे, डॉ. संदीप कवडे, डॉ. शंकर गोरे, डॉ. काश्मिरी बडबडे, डॉ. भाग्यश्री देवकर, डॉ. स्वाती भावे, इ.तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेचे संयोजक वात्सल्य हॉस्पिटल भोसरी यांनी केले आहे तर समन्वयक डॉ. महेश शेटे हे आहेत. परिसरातील डॉक्टरांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन वात्सल्य हॉस्पिटलतर्फे डॉ. रोहिदास आष्टार यांनी केले आहे.

# औद्योगिक क्षेत्रात सामुदायिक 'सोलर प्लँट' साठी पुढाकार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा संकल्प

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी काळात औद्योगिक पट्टयातील सोलर एनर्जी प्रकल्प, महावितरण, एमआयडीसी यांनी एकत्रितपणे प्रकल्प धोरण ठरवण्याबाबत प्रस्ताव तयार करावा, असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी उद्योजक आणि अधिकारी यांना केले. तसेच, हिवाळी अधिवेशनात 'सोलर प्रोजेक्ट'साठी लागणाऱ्या अनुदानासंदर्भात पाठपुरावा करण्याचा संकल्प केला आहे. विशेष म्हणजे, औद्योगिक क्षेत्रात सामुदायिक 'सोलर प्लँट'साठी पुढाकार घेण्याचे निश्चित केले आहे.**



पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून अखंडित वीज पुरवठा सुरू करण्याबाबत आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची आज बैठक झाली. सोलर प्रोजेक्ट उभारणी आणि त्याला येणाऱ्या अडचणीवर काय पाठपुरावा करता येईल? यावर विचार विनिमय करण्यात आला. यावेळी पिंपरी- चिंचवड लघु उद्योजक संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, सुरेश म्हेत्रे, सचिव जयंत कड, नवनाथ वायाळ, संजय सातव, सचिन पाटील, योगेश लोंढे, महावितरणचे प्रभारी अधीक्षक अभियंता संजीव राठोड, भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतूल देवकर, आकुर्डी उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अशोक जाधव, उप कार्यकारी अभियंता सागरे, सहाय्यक अभियंता दिवटे आदी अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत उद्योजकांनी समस्यांचे गाऱ्हाणे मांडले. यामध्ये फिडरला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटणे. फिडरच्या वीज वाहणाऱ्या तारांचे झोल कमी करणे. फिडर पीलरमधील खराब पर्ट्स बदलणे. खराब दरवाजे बदलणे. केबल नादुरुस्त वाहन वेळेवर उपलब्ध करून देणे. फिडरची लांबी कमी करणे व त्यासाठी लागणारे इंव केबल्स उपलब्ध करून देणे. फिडरवरील विजेचा ताण कमी होऊन तक्रारी कमी होतील. ओव्हर लोड ट्रान्सफार्मरवरचा लोड कमी करणे व त्यातील ऑईलची पातळी आवश्यक तेवढीच ठेवणे व आवश्यक त्या ठिकाणी नवीन ट्रांसफार्मर बसविणे. स्विचिंग स्टेशन्सची संख्या वाढविणे. पूर्वीप्रमाणे भोसरी गावठाण व इंद्रायणीनगर असे दोन सेक्शन तसेच दोन असिस्टंट इंजिनिअर अशी कामाची विभागणी करणे या विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आल्या.

### तातडीची कामे मार्गी लावणार

» उद्योजकांनी दोन मागण्या तातडीने पूर्ण करण्याबाबत मागणी केली. यामध्ये पेठ क्रमांक 7 व 10 साठी चार बे ब्रेकर बसवून त्यासाठी केबल देणे. त्यामुळे फिडर 1 व 2 वरील अतिरिक्त वीज भार कमी होईल. वारंवार वीज पुरवठा खंडित होणार आहे. कुदळवाडी चिखली औद्योगिक परिसर सध्या मोई फिडरवर असून, तो टाटा फिडरला जोडून देण्यात यावा. कारण मोई फिडर हा ग्रामीण विभागात येतो तसेच या फिडरवर दगडी क्रशर मशिन जास्त असल्यामुळे या फिडरवर वीज खंडित होण्याचे प्रमाणदेखील जास्त आहे. भोसरी उपविभाग क्रमांक २ चे विभाजन करून इंद्रायणीनगर शाखा कार्यालय व भोसरीगाव असे दोन विभाग करावेत, अशी प्रामुख्याने मागणी आहे. या मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यासाठी आमदार लांडगे यांनी आश्वस्त केले आहे.



“ औद्योगिक क्षेत्रातील तसेच पिंपरी-चिंचवडमधील महावितरण संदर्भात समस्या सोडवण्यासाठी आणि पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सभागृहामध्ये मागणी केली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 260 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्या माध्यमातून काही कामे आता मार्गी लागणार आहेत. तसेच, उद्योजकांच्या समस्या आणि मागण्यांबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार आहे.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

# शहरातील रेल्वे प्रवाशांना मिळणार दर्जेदार सुविधाः शंकर जगताप

## ‘अमृत भारत स्टेशन’ योजनेअंतर्गत आकुर्डी रेल्वे स्थानकाचा होणार विकास

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशभरातील ५०८ रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास करण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्टेशनसह आकुर्डी रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास करण्यात येणार आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड शहर जिल्हा भाजपा शहराध्यक्ष यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

शनिवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यावेळी आमदार उमाताई खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, भाजपा शहर सरचिटणीस राजू दुर्गे, माजी गटनेते नामदेव ढाके, प्रदेश युवा मोर्चा सचिव अजित कुलथे, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे आदी उपस्थित होते.



यावेळी शंकर जगताप यांनी सांगितले की, “आझादी का अमृत महोत्सव” देशभर साजरा केला जात असून देशाला विकासाची नवी दिशा देण्याचा संकल्प करण्यात आला. ‘अमृत भारत स्टेशन’ योजनेअंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या पुनर्विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रमामध्ये केंद्र सरकारने वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले. या निमित्त पिंपरी चिंचवड भारतीय जनता पक्षाच्या वतीने ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान शहरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये “हर घर तिरंगा” आणि “मेरी मिट्टी मेरा देश” हे अभियान प्रभावीपणे पिंपरी चिंचवड शहरात राबविण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक प्रभागात असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ एक फलक लावण्यात येणार आहे. तसेच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. १४ ऑगस्ट रोजी देशाच्या फाळणीच्या काळात ज्यांनी प्राण गमावले त्या सर्वांना श्रद्धांजली वाहिली जाईल. आमदार उमा खापरे म्हणाल्या, ‘अमृत भारत स्टेशन’ योजनेअंतर्गत समाविष्ट रेल्वे स्थानकात रेल्वे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सोयी सुविधा मिळणार आहेत. या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी रेल्वे स्टेशनचा समावेश करण्यात आला याचा आनंद आहे. या योजनेद्वारे आकुर्डी रेल्वे स्टेशनचा विकास होईल. विकास कामांसाठी सुमारे ३३.८३ कोटींचा निधी केंद्राने मंजूर केला आहे.

### रेल्वे स्थानकाच्या परिसराचे सुशोभीकरण


» सदाशिव खाडे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी रेल्वे स्थानकाचा अमृत भारत योजनेंतर्गत समावेश केल्याबद्दल रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, राज्य मंत्री रावसाहेब दानवे, मंत्री दर्शना जरदोश यांचे शहरवासीयांच्या वतीने आभार मानतो. आकुर्डी रेल्वे स्थानकात प्रवेशासाठी दोन प्रवेशद्वार, दुचाकी, चार चाकी वाहनांसाठी प्रशस्त वाहनतळ, प्रवासी नागरिकांसाठी प्रतिक्षा कक्ष, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी कक्ष बांधणी, फलाटावर जाण्या–येण्यासाठी सरकते जिने, प्रसाधनगृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रेल्वे स्थानकाच्या परिसराचे सुशोभीकरण आदी विकास कामे करण्यात येणार आहेत, असे खाडे यांनी सांगितले.




# सतत राजकीय पक्ष फुटणे

**लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून चालणाऱ्या लोकशाहीत राजकीय पक्ष हे महत्त्वाची भूमिका बजावत असतात. काही लोकशाहीचा इतिहास पाहिल्यास, पक्ष व्यवस्था सुरळीत राहिल्यास लोकशाही अधिक बळकट होते असे दिसून येते. पण या पक्षांतच मतभेद असतील, बंडखोरी असेल तर त्याची परिणती पक्ष फुटण्यात होते.**

असे प्रकार वारंवार घडत असतील तर ही बाब लोकशाहीच्या मुळावर येण्यासारखी आहे. आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षांची संख्या सातत्याने वाढत गेली आहे. आज सहा राष्ट्रीय पक्ष, ५४ प्रादेशिक पक्ष आणि २५९७ बिगर मान्यतेचे पक्ष आहेत. यात राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरचे पक्ष हे निवडणुकीत अधिक महत्त्वाचे मानले जातात. अर्थात काही बिगर मान्यतेचे पक्ष देखील ठरावीक भागात मैदानात उतरतात.



मात्र ते बहुतांशवेळा दबाव गटाच्या रूपाने सक्रिय असतात. एवढेच नाही तर काही पक्ष हे कर सवलतीचा लाभ मिळवत संशयास्पद व्यवहारात सक्रिय राहतात. एकूणच आपल्याकडे अमेरिका आणि ब्रिटनच्या तुलनेत वेगळं चित्र पाहावयास मिळतं. तेथे राष्ट्रीय स्तरावर केवळ दोन किंवा तीन प्रमुख पक्ष निवडणूक लढवतात. भारतीय राजकारणात फूट पडणे किंवा बंडखोरी होणे ही नवीन बाब नाही. आपल्याकडे पहिली फूट १९६४ मधे कम्युनिस्ट पक्षात पडली. त्यानंतर काही वर्षांनी सत्ताधारी काँग्रेस पक्षालाच अशा प्रकारचा फुटीचा सामना करावा लागला. अलीकडच्या काळात पक्षात फूट पडण्याची आणि बंडखोरीची आलेली लाट पाहता सत्ता मिळवण्यासाठी आपल्या राजकीय विचारांना तिलांजली दिली जात असल्याचे दिसून येते. पक्ष फुटण्याच्या स्वरूपातही बदल झाला आहे. आता तर मूळ पक्षात प्रामुख्याने नेतृत्वाच्या संघर्षावरून एखादा नेता पक्षातून बाहेर पडतो आणि तो सत्ताधारी पक्ष किंवा आघाडीत सामील होतो.

अशा प्रकारची फूट ही संख्याबळ आणि सत्ताधारी पक्षाच्या सामर्थ्यावर बऱ्याच अंशी अवलंबून असते. लोकशाहीत निवडून येणाऱ्या प्रतिनिधींनी लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा असते. मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्यापक योगदान द्यावे, असेही म्हटले जाते.

अशा स्थितीत आपल्या राजकीय व्यवस्थेत आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण फुटीचा अनुभव मिळतो. निवडणुकपूर्व आघाडी करत मैदानात उतरलेला पक्ष हा निकालानंतर सरकारमधे सामील होण्यासाठी जुनी आघाडी तोडून नव्याने समीकरण तयार करतो. ही बाब लोकशाहीसाठी योग्य नाही. कारण यात लोकांच्या इच्छा किंवा मतांचा कौल याचे अचूक प्रतिबिंब पडत नाही. पक्षांचे आणि नेत्यांचे वर्तन ही एकप्रकारे लोकशाहीची अवहेलनाच आहे. निवडणुकीनंतर किंवा निकालानंतर काही दिवसांतच पक्षात होणारी फाटाफूट ही आपल्या राजकारणाची क्लेशदायक बाजू आहे. फाटाफूट किंवा बंडखोरीच्या वेळी आपण लोकशाहीची मूल्ये बाजूला ठेवतो. अशावेळी पक्षांतरविरोधी कायद्याची माहिती घेणे गरजेचे ठरते. या कायद्यानुसार एखाद्या गटाला अधिकृत मान्यता मिळवायची असेल तर मूळ पक्षापासून वेगळे होणारे आमदार किंवा खासदारांची संख्या ही पक्षाच्या एकूण आमदार किंवा खासदारांच्या दोन तृतीयांश असणे बंधनकारक आहे.

यापेक्षा कमी संख्येने सदस्य बाहेर पडत असतील ते अपात्र म्हणून घोषित करण्यात येते. तरीही पक्षात फूट रोखण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून होणारे प्रयत्न कमीच आहेत. अशा प्रकारची फूट ही लहान पक्षांत अधिक दिसून येते आणि सरकार अस्थिर होऊ शकते.

एकंदरीतच लहान, मध्यम आकाराच्या पक्षांची वाढती संख्या ही नवनिर्वाचित सरकारच्या स्थैर्यावर टांगती तलवार आहे. एखाद्या पक्षात अंतर्गत वादावरून फूट पडते तेव्हा त्यात पक्षाची बांधणी, व्यवस्थापन कायद्याचा अभाव असल्याचा अनुभव येतो. भारतीय निवडणूक आयोगाने सातत्याने राजकीय पक्षांना अशा प्रकारच्या कायद्याची शिफारस केली. कायदा आयोगाबरोबरच घटनेचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेले न्यायाधीश व्यंकटचलय्या समितीने देखील पक्षांची बांधणी, कामकाज, फूट किंवा 'विलीनीकरणाला नियमित करण्यासाठी एक वेगळा कायदा तयार करण्याचा सल्ला दिला आहे.

## संपादकीय »

### प्रेमाचे परवाना-राज!

***जोडीदार निवडण्याच्या अधिकारात आईवडिलांनी प्रेमापोटी हस्तक्षेप करणे हे समजण्यासारखे आहे, पण त्या हस्तक्षेपाला कायद्याचे अधिष्ठान देण्याचा प्रकार राज्ययंत्रणेने करू नये..***

मानवी वंशामध्ये १३-१४ व्या वर्षांनंतर निसर्ग त्याचे काम सुरू करतो आणि स्त्री असो वा पुरुष, त्या शरीरात, मनात असंख्य धुमारे फुलू लागतात. पौगंडावस्था सरून तारुण्यात येण्यासाठी तुम्ही काहीच करायचे नसते, पण तरीही तिचा सगळ्यात मोठा परिणाम तुमच्यावरच होणार असतो. प्रेमात पडणे हा तिचाच पुढचा टप्पा. प्रत्येकाच्याच आयुष्यात तो येईल असे नाही, पण ज्यांच्या तो येतो, त्यांना आयुष्यभर एकमेकांसोबत राहावे, असे निदान त्या क्षणी तरी वाटत असते. आपल्याकडे प्रेमाची परिणती विवाहात होणे अपरिहार्य मानले जात असल्याने त्यांना विवाह करून एकमेकांसोबत राहायचे असते. कुटुंबीयांच्या विरोधाची पर्वा न करणारी जोडपी, पुढे दोन्ही कुटुंबांमध्ये रुळूही शकतात. गुजरातच्या मुख्यमंत्र्यांना मात्र हे मान्य नसावे.

**'नकोशी' नावाच्या जवळपास २६५ मुलींची नावे एका सार्वजनिक समारंभात बदलण्यात आली होती. या घटनेकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधले होते. परंतु सकारात्मकतेच्या भावनेअभावी, नामांतर समारंभाने मुलींचे जीवन फारसे बदलले नाही. अभ्यासाअंती असे सूचित करावे वाटते की, या विस्मृतीत गेलेल्या नकोशींना पितृसत्ताक सांस्कृतिक प्रथा आणि भेदभाव यातून मुक्त होण्यासाठी नाव बदलण्याच्या प्रतिकात्मकतेपेक्षा अधिक गरज आहे.**

# 'नकुशी' कधी होणार 'हवीशी'?

भारतातील बहुतांश भागात आणि महाराष्ट्र राज्यात आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक कारणांमुळे मुलींपेक्षा मुलग्यांना प्राधान्य दिले जाते. विशेषत: हुंडा संस्कृती प्रचलित असलेल्या ठिकाणी मुलींकडे आर्थिक ओझे म्हणूनच पाहिले जाते. म्हणूनच, मुलींबद्दलचा अनादर स्त्री भ्रूणहत्येसारख्या टोकाच्या कृत्यांच्या रूपात व्यक्त होतो. या विसंगतीचा आणखी एक पैलू एका अन्यायकारक प्रथेत दिसून येतो. ती म्हणजे काही ठिकाणी घरात जन्माला आलेल्या मुलीचे नाव 'नकुसा/नकोशी' असे ठेवलं जातं. नकुसा म्हणजे 'नको असलेली'. अत्यंत गरीब आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित कुटुंबांमध्ये मुलग्यांची वाट बघतना मुलीच जन्माला आल्या असतील तर तिथे शेवटच्या मुलीचे नाव 'नकोशी' किंवा 'नकुसा/नकुशा' असे ठेवण्यात येते. निराशा, पूर्वग्रह आणि अज्ञानामुळे ही प्रथा सातत्यात जोपासली गेली असली



तरी ती हिंदू धर्मात जवळ जवळ सर्व जाती आणि वर्गांमध्ये प्रचलित असल्याचे दिसून आले आहे. तरी बहुतेक तळच्या सामाजिक-आर्थिक स्तरांमध्ये ती अधिक प्रचलित आहे. शेवटच्या मुलीचे नाव 'नकोशी' ठेवले तर पुढील बाळ मुलगा होईल, अशी अंधश्रद्धा या वर्गांमध्ये आहे. २०११ मध्ये जिल्हा प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणानुसार 'नकोशी' नावाच्या २६५ मुली (१८ वर्षांखालील) आढळल्या होत्या. विशेषत: अशा नावांची माहिती मिळवण्यासाठी आणि ही प्रतिगामी प्रथा बंद करून सार्वजनिक धोरण तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यामुळे नकोशी नावाच्या मुलींना आपणही हवेसे आहोत असे वाटावे यासाठी त्यावेळच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी अशा मुलींच्या नामांतर सोहळ्याचे आयोजन केले होते. विंदा सातारा येथील वाई तालुक्यातील बावधन गावात राहते. विंदाला तीन बहिणी आणि एक भाऊ होता. त्यापैकी तिची सर्वात मोठी बहीण आणि सर्वात धाकटा भाऊ बालपणातच मरण पावला. ती तिच्या कुटुंबातील तिसरे अपत्य आहे आणि ती धनगर (मेंढपाळ) समाजातील आहे तथापि, विंदाचे कुटुंब थेट मेंढपाळ व्यवसायात गुंतलेले नाही, कारण कमी परताव्यामुळे त्यांना ते काम व्यवहार्य वाटत नाही. तिचे पती शेतात रोजंदारीवर काम करतात.

विंदाच्या आईने तिच्या जन्माच्या आधी दोन मुलींना जन्म दिला होता, म्हणून तिच्या जन्मानंतर मुलगा न झाल्याच्या निराशेतून पालकांनी तिचे नाव 'नकोशी' ठेवले. जर त्यांनी तिचे नाव नकोशी ठेवले तर पुढचे अपत्य मुलगा होईल असा त्यांचा ठाम विश्वास होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवारांना जबर धक्का ?

## » एक मोठा मोहरा अजित पवारांच्या गळाला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचा आणखी एक मोठा नेता अजित पवार यांच्या गळाला लागल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, हा नेता शरद पवार यांच्या जवळचा आहे. तो लवकरच अजित पवार यांच्या गटात सामील होईल.**

त्यानंतर आगामी मंत्रिमंडळ विस्तारात त्याला मंत्रिपदाची लॉटरीही लागेल. अजित पवार यांनी गत 2 जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी केली. त्यांच्यासोबत छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आदी बडे चेहरेही गेले. त्यानंतर अजित पवार यांनी शिंदे - फडणवीस सरकारमध्ये थेट उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तर भुजबळ, मुंडे, वळसे व मुश्रीफ यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या गटातील आणखी एक नेता अजित पवारांच्या गळा लागल्याची चर्चा सुरू झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांना तुमचे आमच्याकडे लक्षच नसल्याचा टोला हाणला होता. तेव्हापासून राज्यात शरद पवार यांचा आणखी एक मोहरा अजित पवार यांना पाठिंबा देणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यामुळे शरद पवार यांना आणखी एक मोठा झटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, शरद पवारांची साथ सोडण्याच्या तयारीत असणाऱ्या राष्ट्रवादीच्या या बड्या नेत्याने अधिवेशन काळात भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्याने संभाव्य घडामोडींवर विस्तृत चर्चा केली. हा नेता अजित पवारांच्या गटात गेल्यानंतर त्याला पुढील मंत्रिमंडळ विस्तारात कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ दिली जाईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शनिवारी पुणे दौऱ्यावर येणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व अजित पवार या प्रकरणी या दौऱ्यात त्यांच्याशी चर्चा केली. यात मंत्रिमंडळ विस्ताराचा मुद्दा प्रमुख अजेंडा असेल, अशी माहिती आहे.

### शरद पवार 'मविआ'तच

» पक्षातील बडे नेते साथ सोडून जात असताना शरद पवार यांनी मात्र आपण महाविकास आघाडीसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच राज्यभर दौरे करून पक्ष संघटना पुन्हा उभी करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला आहे. पक्षात यापुढे तरुणांना अधिकाधिक संधी देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# मुंबईत इंडियाची तिसरी बैठक!

## » राष्ट्रीय पातळीवरील नेते येणार : पटोले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीआधी विरोधी पक्षांनी केंद्रातील मोदी सरकारविरोधात जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपाविरोधात विरोधकांची मोर्चेबांधणी सुरू आहे. २३ जून रोजी विरोधकांची बिहारच्या पाटणा येथे पहिली बैठक पार पडली. या बैठकीला देशातले १६ पक्ष एकत्र आले होते.**

त्यानंतर गेल्या महिन्यात १७ आणि १८ जुलै रोजी कर्नाटकच्या बंगळुरू शहरात विरोधकांची दुसरी बैठक पार पडली. यावेळी देशातील २६ विरोधी पक्ष एकत्र जमले होते. यावेळी विरोधकांच्या आघाडीला 'इंडिया' (INDIA – इंडियन नॅशनल डेव्हलपमेन्ट इन्क्लुझिव्ह अलायन्स) असं नाव देण्याचा निर्णय झाला. त्यापाठोपाठ आता इंडियाची पुढची बैठक मुंबईत होणार आहे. इंडिया आघाडीच्या मुंबईत होणाऱ्या बैठकीचं आयोजन महाविकास आघाडी करणार आहे. शिवसेनेचा ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार गट आणि महाराष्ट्र काँग्रेस या बैठकीचं संयुक्तपणे आयोजन करणार आहे. या बैठकीच्या आयोजनासंबंधी चर्चेसाठी महाविकास आघाडीतल्या नेत्यांच्या बैठका होत आहेत.



### खरगेदेखील बैठकीला येणार

» नाना पटोले म्हणाले आमच्याबरोबर उद्धव ठाकरे आहेत, शरद पवार आहेत. हे दोन नेते आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत. यांच्याबरोबर मिळून आम्ही या बैठकीचं नियोजन करत आहोत. राहुल गांधी याच्यावरील खटल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने काल (४ ऑगस्ट) दिलेल्या निकालानंतर देशभरात आनंदाचं वातावरणं आहे. काँग्रेसमध्ये जल्लोषाचं वातावरण आहे. राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेदेखील या बैठकीला येणार आहेत.

आज वरळीतल्या ग्रँड हयात हॉटेलमध्ये महाविकास आघाडीचे नेते भेटले. 'इंडिया'च्या आगामी बैठकीच्या आयोजनासंबंधी चर्चा पार पडल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचित केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांची उत्तरं दिली.

यावेळी नाना पटोले यांनी जाहीर केलं की, इंडिया आघाडीची आगामी म्हणजेच तिसरी बैठक मुंबईत ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रजी पार पडेल. महाविकास आघाडी या बैठकीचं आयोजन करत आहे. महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष ठाकरे गट, शरद पवार गट आणि महाराष्ट्र काँग्रेसमधील प्रत्येकी पाच नेत्यांचं एक पथक तयार करण्यात आलं आहे. हे १५ नेते बैठकीचं नियोजन करतील. काँग्रेसकडून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण या पथकात असतील.

# मुख्यमंत्री शिंदेंची जगभरात क्रेझ!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

अमेरिकेच्या न्युयॉर्क शहरातील टाईम स्क्वेअरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो झळकले आहेत. टाईम स्क्वेअरवर झळकणारे एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील पहिले राजकारणी ठरले आहेत. महाविकास आघाडीतून बाहेर पडून एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत घरोबा केला आहे. तेव्हापासून त्यांची लोकप्रियता वाढत असल्याचे दिसून येतेय.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो टाईम स्क्वेअरवर झळकल्याने राज्यभर सध्या याचीची चर्चा सुरू आहे. युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांचे निकटवर्तीय राहुल कनाल यांनी एक जुलैला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केलाहोता. या पक्षप्रवेशाचे फोटो न्युयॉर्कच्या टाईम्स स्क्वेअरवर झळकले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतच त्यांचा पुत्र खासदार



श्रीकांत शिंदे आणि राहुल कनाल या तिघांचे फोटो टाईम्स स्क्वेअरवर झळकले आहेत. राहुल कनाल यांच्यावतीनं हा उपक्रम राबवण्यात आला होता. त्यामुळे राज्यभरातील युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

राहुल कनाल हे आदित्य ठाकरेंचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जात होते. मात्र, शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर कनाल समर्थकांसह शिंदेंच्या शिवसेनेत आले होते. त्यात आता त्यांनी हा उपक्रम राबवल्यामुळे त्याची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. कनाल हे शिर्डी देवस्थानाचे विश्वस्त देखील आहेत.

# चांद्रयान-3 चंद्राच्या कक्षेत पोहोचले

## »1 ऑगस्टला सोडली होती पृथ्वीची कक्षा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**22 दिवसांच्या प्रवासानंतर आज संध्याकाळी 7.15 वाजता चांद्रयान-3 ने चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला. हे 14 जुलै रोजी पृथ्वीवरून प्रक्षेपित करण्यात आले. चंद्राच्या गुरुत्वाकर्षणात वाहन कॅप्चर व्हावे म्हणून वाहनाचा वेग कमी करण्यात आला. वेग कमी करण्यासाठी इस्रोच्या शास्त्रज्ञांनी काही काळ वाहनाचे थ्रस्टर उडवले. इस्रोने एक्स पोस्टमध्ये ही माहिती दिली आहे.**


इस्रोने X पोस्टमध्ये लिहिले, 'MOX, ISTRAC, हे चांद्रयान-3 आहे. मला चंद्राचे गुरुत्वाकर्षण जाणवते. चांद्रयान-3 चंद्राच्या कक्षेत यशस्वीरित्या ठेवण्यात आले आहे. आता 6 ऑगस्ट 2023 रोजी रात्री 11 वाजता चांद्रयानाची कक्षा कमी होणार आहे. 23 ऑगस्टला लँडिंग करण्यापूर्वी चांद्रयान 4 वेळा आपली कक्षा बदलेल. 1 ऑगस्ट रोजी रात्री 12 च्या सुमारास चांद्रयान-3 पृथ्वीच्या कक्षेतून चंद्राच्या दिशेने पाठवण्यात आले. याला ट्रान्सलुनर इंजेक्शन म्हणतात. यापूर्वी, चांद्रयान अशा लंबवर्तुळाकार कक्षेत फिरत होते, ज्याचे पृथ्वीपासून किमान अंतर 236 किमी आणि कमाल अंतर 1 लाख 27 हजार 603 किमी होते. ते 23 ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरेल. ट्रान्सलुनर इंजेक्शनसाठी, इस्रोच्या बेंगळुरू येथील मुख्यालयातील शास्त्रज्ञांनी काही काळ चांद्रयानचे इंजिन सुरू केले. चांद्रयान पृथ्वीपासून 236 किमी अंतरावर असताना इंजिन फायर करण्यात आले. इस्रोने म्हटले आहे- चांद्रयान-3 पृथ्वीभोवती प्रदक्षिणा पूर्ण करून चंद्राकडे सरकत आहे. इस्रोने अंतराळयान ट्रान्सलुनर कक्षेत ठेवले आहे.

चांद्रयान-3 मध्ये लँडर, रोव्हर आणि प्रोपल्शन मॉड्यूल आहे. लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरतील आणि तेथे 14 दिवस प्रयोग करतील. प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेत राहून पृथ्वीवरून येणाऱ्या रेडिएशनचा अभ्यास करेल.

या मोहिमेद्वारे इस्रो चंद्राच्या पृष्ठभागावर भूकंप कसे होतात हे शोधून काढणार आहे. चंद्राच्या मातीचाही अभ्यास करणार आहे. इस्रोचे माजी शास्त्रज्ञ मनीष पुरोहित म्हणतात की, या मिशनद्वारे भारत जगाला सांगू इच्छितो की चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्याची आणि तेथे रोव्हर चालवण्याची आपली क्षमता आहे. यामुळे भारतावरील जगाचा विश्वास वाढेल ज्यामुळे व्यवसाय वाढण्यास मदत होईल. भारताने आपल्या हेवी लिफ्ट लॉन्च व्हेईकल LVM3-M4 वरून चांद्रयान प्रक्षेपित केले आहे. भारताने या वाहनाची क्षमता जगाला दाखवून दिली आहे.

यापूर्वी ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस यांच्या 'ब्लू ओरिजिन' कंपनीने इस्रोचे LVM3 रॉकेट वापरण्यात रस दाखवला होता. BLUE ORIGIN ला LVM3 व्यावसायिक आणि पर्यटन हेतूंसाठी वापरायचे आहे. LVM3 द्वारे, ब्लू ओरिजिन आपल्या क्रू कॅप्सूलला नियोजित लो अर्थ ऑर्बिट (LEO) स्पेस स्टेशनवर घेऊन जाईल. चंद्राचे ध्रुवीय प्रदेश इतर प्रदेशांपेक्षा बरेच वेगळे आहेत.

येथे असे अनेक भाग आहेत जेथे सूर्यप्रकाश कधीच पोहोचत नाही आणि तापमान -200 अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाते. अशा परिस्थितीत बर्फाच्या रूपात अजूनही पाणी असू शकते असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. भारताच्या 2008 चांद्रयान-1 मोहिमेने चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याची उपस्थिती दर्शविली होती. या मोहिमेची लँडिंग साइट चांद्रयान-2 सारखीच आहे. 70 अंश अक्षांशावर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ. मात्र यावेळी क्षेत्रफळ वाढविण्यात आले आहे. चांद्रयान-2 मधील लँडिंग साइट 500 मीटर X 500 मीटर होती. आता, लँडिंग साइट 4 किमी X 2.5 किमी आहे. सर्व काही ठीक राहिल्यास, चांद्रयान-3 चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ सॉफ्ट-लँड करणारे जगातील पहिले अंतराळ यान बनेल. चंद्रावर उतरण्यासाठी पूर्वीचे सर्व अंतराळ यानं विषुववृत्ताच्या उत्तरेला किंवा दक्षिणेला काही अंश अक्षांशावर उतरले आहेत. या वेळी लँडरला चार इंजिन (थ्रस्टर्स) चार कोपऱ्यात बसवले आहेत, गेल्या वेळी मध्यभागी असलेले पाचवे इंजिन काढून टाकण्यात आले आहे. फायनल लँडिंग केवळ दोन इंजिनांच्या मदतीने केले जाईल, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत दोन इंजिन काम करू शकतील. चांद्रयान 2 मोहिमेत शेवटच्या क्षणी पाचवे इंजिन जोडण्यात आले.



### भारत हा चौथा देश ठरणार

» जर सॉफ्ट लँडिंग अर्थात मिशन यशस्वी झाले तर अमेरिका, रशिया आणि चीननंतर भारत असे करणारा चौथा देश ठरेल. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांनी चंद्रावर यशस्वीरीत्या उतरण्यापूर्वी अनेक अंतराळयान क्रॅश झाले होते. 2013 मध्ये चांगई-3 मिशनच्या पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झालेला चीन हा एकमेव देश आहे.

# हरियाणा : पाकिस्तानी कनेक्शन

## » स्वत:ला राजस्थानचा असल्याचे सांगितले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हरियाणातील नूह हिंसाचारात आता पाकिस्तानी कनेक्शन समोर आले आहे. हरियाणा पोलिसांच्या तपासात पाकिस्तानी यूट्यूबर झिशान मुश्ताकची माहिती समोर आली आहे. त्याने प्रक्षोभक व्हिडिओ पोस्ट केले. पोलीस सूत्रांनी भास्करला सांगितले की, युट्युबरने एहसान मेवाती पाकिस्तानी या नावाने सोशल मीडिया अकाउंट सुरू केले होते.**



### दुसऱ्या दिवशीही बुलडोझरची कारवाई

दरम्यान, नूह येथील हिंसाचाराला पाच दिवस उलटूनही राज्य सरकारची बुलडोझरची कारवाई दुसऱ्या दिवशीही सुरूच आहे. शनिवारी पोलिस दलासह अधिकारी 4 बुलडोझर घेऊन नूह येथे पोहोचले. येथे नल्हार रोडवर 30 घरे व दुकाने फोडण्यात आली. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की ही बेकायदेशीर बांधकामे आहेत आणि 31 जुलैला झालेल्या हिंसाचारात रहिवाशांचा सहभाग होता.

वापरकर्त्याने त्याचे स्थान राजस्थानमधील अलवर असे दिले होते, परंतु प्रत्यक्षात तो पाकिस्तानमधील इस्लामाबाद आणि लाहोरमधून व्हिडिओ पोस्ट करत होता. झिशानने पाकिस्तान एज्युकेशन अँड रिसर्च नेटवर्क (PERN) द्वारे व्हिडिओ अपलोड केले.

हा पाकिस्तान सरकारचा एक भाग आहे. झिशानने मोनू मानेसरला मारण्यासाठी आणि नूह येथील हिंसाचारासाठी व्हिडिओतून भडकावले होते. ज्या दिवशी हिंसाचार सुरू होता, त्याच दिवशी जाळपोळ, तोडफोडीचे फुटेजही प्रसिद्ध होत होते. नुहमध्ये झिशानचे मजबूत नेटवर्क असल्याचा पोलिसांना संशय आहे. आतापर्यंतच्या तपासाच्या आधारे पोलिसांनी गुन्हा नोंदवण्याची तयारी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीकडे तयार करण्यात आलेल्या अशा अनेक सोशल मीडिया प्रोफाइलची पोलीस चौकशी करत आहेत. त्यांच्याकडून सातत्याने भडकाऊ पोस्ट आणि व्हिडिओ अपलोड केले जात आहेत. यातील एक एहसान मेवातीचे प्रोफाइल व्हायरल झाले आहे.

# दिल्ली हादरली :

## भूकंपाचे तीव्र धक्के


। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतून मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीत भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता तब्बल 5.5 रिश्टर स्केल होती, अशी प्राथमिक माहिती मिळत आहे. आज रात्री 9 वाजून 34 मिनिटांच्या सुमारास दिल्लीत भूकंपाचे धक्के जाणवले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अफगाणिस्तान येथील हिंदूकूश पर्वत येथे भूकंपाचे केंद्रबिंदू होते. सध्या तरी कोणत्याप्रकारच्या जीवितहानीची किंवा इतर नुकसानीची माहिती समोर आलेली नाही.

पण भूकंपाची तीव्रता



जास्त होती. भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अफगाणिस्तानच्या हिंदूकुश येथे भूकंपाचे केंद्र असल्यामुळे भारतासह पाकिस्तानतही धक्के जाणवले आहेत.

जम्मू-काश्मीरमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. विशेष म्हणजे भूकंपाची घटना ही पहिली नाही. याआधी देखील वारंवार दिल्ली आणि जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने भूकंपाचे धक्के बसत आहेत.

# रॉकी-राणीची कमाई 80.23 कोटींवर



रॉकी और रानी की प्रेम कहानी चित्रपट सध्या चांगली कमाई करत आहे. चित्रपटाने आठव्या दिवशी म्हणजे शुक्रवारी 6.90 कोटी रुपयांची कमाई केली. त्यामुळे चित्रपटाचे एकूण कलेक्शन 80.23 कोटी रुपये झाले आहे. चित्रपटाने पहिला आठवडा यशस्वीपणे घालवला आहे. आता कामाचे दिवस असूनही चित्रपटाने चांगली कमाई केली आहे. दुसऱ्या वीकेंडला म्हणजेच शनिवार आणि रविवारी चित्रपटाची कमाई पुन्हा वाढू शकते. गदर-2 11 ऑगस्टला प्रदर्शित होत आहे. याशिवाय OMG-2 देखील त्याच दिवशी रिलीज होणार आहे. त्यामुळे हा संपूर्ण आठवडा सध्या रॉकी-राणीसाठी रिकामा आहे. मात्र, 11 ऑगस्टनंतर हे गणित बदलणार आहे. या दोन्ही चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळाला तर रॉकी-राणीची कमाई मोठ्या प्रमाणावर होऊ शकते.

नवीन चित्रपट आल्यानंतर जुन्या चित्रपटांची क्रेझ खूपच कमी होते. मात्र, रॉकी-राणीची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे, त्यामुळे हा चित्रपट इतक्या लवकर चित्रपटगृहातून उतरेल असे वाटत नाही. रणवीर सिंगला रॉकी आणि राणीकडून खूप आशा आहेत. त्याचे शेवटचे दोन चित्रपट सुपर फ्लॉप ठरले आहेत. रोहित शेट्टी दिग्दर्शित सर्कस केवळ 35.65 कोटींची कमाई करू शकला. येशभाई जोरदार यांची त्याहून वाईट अवस्था होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर केवळ 15.59 कोटी रुपये कमावले. '83' चित्रपटाने ठिकठाक तर गली बॉयने चांगला व्यवसाय केला. रॉकी आणि राणीचे आतापर्यंतचे कलेक्शन चांगले आहे. आता आगामी काळात चित्रपटाची कमाई कायम राहते की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आलिया भट्टचे मागील काही चित्रपट हिट ठरले आहेत. तिच्या 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाचे कलेक्शन 257.44 कोटी होते.पण चित्रपटाच्या बजेटनुसार कलेक्शन चांगले नव्हते. गंगुबाई काठियावाडी नक्कीच हिट ठरला. याशिवाय राझी सुपरहिट ठरला, पण कलंक फ्लॉप ठरला. या चित्रपटाने पहिल्या आठ दिवसांत 80 कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाचे एकूण बजेट 178 कोटी आहे. त्यानुसार चित्रपटाचे बजेट जवळपास निघाले आहे. या चित्रपटाने आतापर्यंत डिजिटल राइट्समधून 80 कोटी रुपये आणि सॅटेलाइट राइट्समधून 50 कोटी रुपये कमावले आहेत. याशिवाय निर्मात्यांनी त्याचे संगीत हक्क 30 कोटी रुपयांना विकले आहेत.

# जेनेलिया @36



अभिनेत्री जेनेलिया डिसूझाचा आज 36 वा वाढदिवस आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. जेनेलियाचा ट्रायल पीरियड हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. दाक्षिणात्य व हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःची ओळख निर्माण करणारी ही गुणी अभिनेत्री वयाच्या 15व्या वर्षापासूनच अभिनय करत आहे. मात्र ती एकेकाळी राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू होती हे फार कमी लोकांना माहीत असेल. वाढदिवसानिमित्त जाणून घेऊया जेनेलियाच्या आयुष्याविषयी काही खास गोष्टी...

जेनेलियाचा जन्म 5 ऑगस्ट 1987 रोजी मुंबईतील एका कॅथलिक कुटुंबात झाला. जेनेलियाला लहानपणापासूनच खेळाची आवड होती आणि शालेय शिक्षणादरम्यान ती राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू होती. मात्र त्यानंतर तिला चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आणि तिने मार्ग बदलला. जेनेलियाचा अर्थ युनिक म्हणजेच अनोखा असा होतो. जेनेलियाने मुलाखतीदरम्यान अनेकवेळा सांगितले आहे की तिचे नाव तिच्या पालकांच्या नावातून तयार करण्यात आले आहे. जेनेलियाच्या आईचे नाव जेनेट आणि वडिलांचे नाव नील आहे. दोघांचे नाव एकत्र करून जेनेलिया हे नाव तिला देण्यात आले. जेनेलियाने अभिनयात पदार्पण महानायक अमिताभ बच्चन यांच्यासोबत केले आहे. जेनेलिया पहिल्यांदा अमिताभ बच्चन यांच्यासोबत एका जाहिरातीत दिसली होती. त्यावेळी जेनेलिया केवळ 15 वर्षांची होती. ही जाहिरात पार्कर पेनची होती. 2003 मध्ये जेनेलिया डिसूजा पहिल्यांदा रुपेरी पडद्यावर दिसली. चित्रपटाचे नाव होते 'तुझे मेरी कसम'. यामध्ये तिच्यासोबत अभिनेता रितेश देशमुख होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान जेनेलियाने तिचे शिक्षण पूर्ण केले. जेनेलियाने त्यानंतर तेलुगू, हिंदी, कन्नड आणि

# सुट्टी घालवण्यासाठी हिरोईन बनली काजोल



दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, कभी खुशी कभी गम आणि माय नेम इज खान यांसारख्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये काम केलेली काजोल आज 49 वर्षांची झाली आहे. काजोल ही इंडस्ट्रीतील सर्वात बोल्ड आणि बिनधास्त अभिनेत्री असल्याचे म्हटले जाते. काजोलला तिची आई तनुजा सारखी नायिका बनायची कधीच इच्छा नव्हती, पण शाळेच्या सुट्ट्यांचा कंटाळा तिला चित्रपटात घेऊन आला. गंमत म्हणजे काजोलला तिचा पहिला चित्रपट नशिबाने मिळाला. ती तिच्या मैत्रिणीच्या फोटोशूटच्या संदर्भात स्टुडिओमध्ये गेली होती, जिथे जबरदस्तीने मेकअप करून तिचे फोटो क्लिक केले गेले. काजोलचा जन्म 5 ऑगस्ट 1974 रोजी मुंबईत अभिनेत्री तनुजा आणि दिग्दर्शक शोमू मुखर्जी यांच्या घरी झाला. काजोल लहानपणापासूनच खूप खोडकर आणि हट्टी होती. काजोलचे पालक लहान वयातच वेगळे राहू लागले, त्यामुळे तिचे पालनपोषण तिच्या आजी शोभना यांनी केले. ती आईसोबत महालक्ष्मी परिसरात राहत होती, तर वडील सांताक्रूझ येथे राहत होते. जसजशी ती मोठी होत गेली, काजोल तिच्या वडिलांना भेटण्यासाठी लोकल ट्रेनने दररोज सांताक्रूझला जात असे. काजोलने तिचे सुरुवातीचे शिक्षण पाचगणी येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलमधून केले. शाळेच्या अभ्यासापेक्षा ती नृत्याकडे जास्त लक्ष देत असे. काजोलची आई तनुजा चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध व्यक्ती होती, त्यामुळे ती अनेकदा तिच्यासोबत चित्रपट पार्ट्यांमध्ये जात असे.

# सानूचा सुपर फॅन

झुंझुनूचा रहिवासी असलेला कुमार सानूचा चाहता राकेश बलोदिया 1200 किलोमीटरचा प्रवास करून कुमार सानूला भेटण्यासाठी मुंबईत पोहोचला. राकेश बलोदिया यांनी 17 जुलै रोजी झुंझुनू येथून प्रवास सुरू केला. कुमार सानू यांची त्यांच्या घरी भेट झाली. राकेश कुमार सानूच्या घरी पोहोचताच त्यांनी राकेशला मिठी मारली. राकेशनेही आवडत्या गायकाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मुंबईत पोहोचल्यानंतर एएनआयशी बोलताना राकेश म्हणाला- मी किती आनंदी आहे हे शब्दात सांगू शकत नाही. मी बारावीत असताना कुमार सानूची गाणी पहिल्यांदा ऐकली. मी त्यांच्याकडूनच गाणे शिकले. माझ्या शहरातील लोक मला ओळखतात कारण त्यांच्याकडून शिकून मी माझ्या शहरात माझी ओळख निर्माण केली.

# अरबाजच्या वाढदिवसाच्या पार्टीत सलमान



सलमान खानचा भाऊ अरबाज खानने शुक्रवारी रात्री त्याचा 56 वा वाढदिवस साजरा केला. या खास प्रसंगी भाईजानही त्याला भेटायला आला होता, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये सलमान पूर्णपणे वेगळ्या अंदाजात दिसत आहे. भाईजानने गुलाबी रंगाची पँट घातली आहे. सलमान अरबाजच्या घराबाहेर दिसत आहे. त्याने काळ्या टी-शर्टसह राखाडी रंगाचे जाकीट आणि प्रिंटेड गुलाबी डेनिम जीन्स घातली आहे. यादरम्यान त्याने पूर्ण स्वॅगमध्ये पापाराझींना पोज दिली. व्हिडिओ समोर येताच लोकांनी सांगितले की, सलमानही आता बार्बीचा ट्रेंड फॉलो करत आहे. भाईजानची ही फंकी स्टाइल पाहून चाहते खूपच प्रभावित झाले. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'लव्ह यू भाईजान'. आणखी एका यूजरने लिहिले की, 'मला माहित होते की टायगर खरं तर बार्बी बॉलिवूडचा केन आहे.' तिसऱ्याने लिहिले, भाईजान देखील बार्बी प्रेमी आहे. तर दुसऱ्या यूजरने लिहिले, 'कोण म्हणाले पुरुष गुलाबी रंगाचे कपडे घालू शकत नाहीत, सल्लूकडे पहा.' अरबाजच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी, त्याची बहीण अर्पिताने 3 ऑगस्टला तिचा 33 वा वाढदिवस साजरा केला. या खास प्रसंगी सलमानने बहीण अर्पिताला वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना तिचा न पाहिलेला फोटो शेअर केला. या फोटोत छोटी अर्पिता आपल्या भावाचे बोट चावत असल्याचे दिसत आहे.

# भारत-जपान सामना 1-1 ने अनिर्णित!

## » आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी : हरमनप्रीतचा एकमेव गोल

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय पुरुष हॉकी संघाने शुक्रवारी चेन्नईच्या महापौर राधाकृष्णन स्टेडियमवर आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी 2023 च्या त्यांच्या दुसऱ्या सामन्यात गतविजेत्या जपानविरुद्ध 1-1 अशी बरोबरी साधली. या ड्रॉमुळे भारत दोन सामन्यांतून चार गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.**

**भारताकडून हरमनप्रीत सिंग (43') याने पेनल्टी कॉर्नरवर गोल केला, तर जपानकडून केन नागयोशी (28') याने गोल केला.**



जागतिक क्रमवारीत 19व्या क्रमांकावर असलेल्या जपानने बचाव राखण्याचा प्रयत्न केला असताना भारताने सुरुवातीला आक्रमक भूमिका घेतली. गुरुवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने चीनचा 7-2 असा पराभव केला. रविवारी भारताचा तिसरा सामना मलेशियाविरुद्ध होणार आहे. पहिल्या क्वार्टरमध्ये भारताने आक्रमक खेळ केला. पण एकही गोल झाला नाही.

पेनल्टी कॉर्नरवर कजापनचा बचाव उत्कृष्ट होता. भारताने पहिल्या क्वार्टरमध्ये तीन कॉर्नर खेळले पण त्यांना यश मिळू शकले नाही. दुसऱ्या क्वार्टरमध्येही भारताने आक्रमक खेळ सुरूच ठेवला. पण, जपानने बचाव मजबूत ठेवला. दुसऱ्या क्वार्टरच्या शेवटच्या मिनिटाला जपानने पहिला गोल केला. दुसरा क्वार्टर संपण्यापूर्वी दोन मिनिटे अगोदर केन नागयोशीने पेनल्टी कॉर्नरवरून चेंडू भारताच्या गोळ्यात टाकला. यामुळे जपानला 1-0 अशी आघाडी मिळाली. एका गोलने पिछाडीवर पडलेल्या भारताने जपानवर दडपण आणले आणि शेवटी गोल मिळवला. पेनल्टी कॉर्नरवर भारतीय हॉकी संघाने बरोबरी साधली. हरमनप्रीत सिंगने आपला उत्कृष्ट स्कोअरिंग फॉर्म सुरू ठेवत स्कोअर 1-1 असा बरोबरीत आणला. तिसरा क्वार्टर 1-1 अशा स्कोअर लाइनने संपला. चौथ्या आणि शेवटच्या क्वार्टरमध्ये जपानने बचाव फळी पूर्णपणे मजबूत केली. जपानला ड्रॉ खेळायचा होता, तर भारत विजयाच्या शोधात आक्रमण करत राहिला. मात्र, संघाला आघाडी घेण्यात अपयश आले. चेन्नई येथे पहिल्या दिवशी चीनला 7-2 ने पराभूत करून भारताने आपल्या मोहिमेची जोरदार सुरुवात केली. भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि वरुण कुमार यांनी प्रत्येकी दोन तर सुखजित सिंग, आकाशदीप सिंग आणि मनदीप सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला.

### आशियातील सहा अव्वल संघ

» या स्पर्धेत आशियातील सहा अव्वल संघ (भारत, दक्षिण कोरिया, जपान, मलेशिया, चीन आणि पाकिस्तान) सहभागी होत आहेत. सिंगल-लेग राऊंड-रॉबिन लीग टप्प्याच्या शेवटी अव्वल-4 संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. फायनल 12 ऑगस्टला होणार आहे.

# तिरंदाजीत भारताला गोल्ड!

## » महिला संघाने पहिला क्रमांक पटकावला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताच्या महिला कंपाउंड संघाने प्रथमच जागतिक तिरंदाजी स्पर्धा जिंकली आहे. तिरंदाजीच्या या स्पर्धेत भारताला स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सुवर्णपदक मिळाले आहे. पहिली जागतिक तिरंदाजी स्पर्धा 1931 मध्ये आयोजित करण्यात आली होती. तथापि, 1995 पासून कंपाऊंड इव्हेंट्स होत आहेत. जर्मनीची राजधानी बर्लिन येथे सुरू असलेल्या जागतिक चॅम्पियनशिपच्या कंपाउंडमध्ये भारतीय महिला संघाने अंतिम फेरीत मेक्सिकोचा 235-229 असा पराभव केला. संघात तिरंदाज ज्योती सुरेख, वेन्नम प्रनीत कौर आणि अदिती स्वामी यांचा समावेश होता.**



### ऑलिम्पिकला जाण्याची संधी हुकली

» भारतीय तिरंदाजांमध्ये पुरुष आणि महिला रिकर्व्ह संघ उपांत्यपूर्व फेरीत गारद झाले. यामुळे संघांना थेट ऑलिम्पिकमध्ये जाण्याची संधी गमवावी लागली. आता संघाला पुढील मोठ्या स्पर्धेची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

याआधी उपांत्य फेरीत कोलंबियाचा 220-216 असा पराभव झाला होता. तर भारतीय संघाला पहिल्या फेरीत बाय मिळाला होता. तर उपांत्यपूर्व फेरीत तुर्की आणि उपांत्यपूर्व फेरीत चायनीज तैपेईचा पराभव केला. महिलांच्या कंपाऊंड वैयक्तिक स्पर्धेत प्रथमच टॉप-8 तिरंदाजांमध्ये 3 भारतीयांचा समावेश आहे. भारतीय संघातील ज्योती सुरेख, वेन्नम प्रनीत कौर आणि अदिती स्वामी या तिन्ही तिरंदाजांना उपांत्यपूर्व फेरीत धडक मारण्यात यश आले आहे. जागतिक तिरंदाजी चॅम्पियनशिप 1931 मध्ये सुरू झाली. ही दरवर्षी 1931 ते 1969 पर्यंत आयोजित केली जाते. तर 1969 पासून दर दोन वर्षांनी याचे आयोजन केले जाते. या चॅम्पियनशिपमध्ये भारताने 9 वेळा रौप्य पदक आणि 2 वेळा कांस्य पदक जिंकले आहे. आणि 2006 पासून वर्ल्ड कपचे आयोजन केले जात आहे. दरवर्षी विश्वचषकाचे 4 टप्पे असतात, जे वेगवेगळ्या देशांमध्ये आयोजित केले जातात. हे चार टप्पे एकत्र करून, टॉप-8 संघ आणि तिरंदाज विश्वचषक अंतिम फेरीत सहभागी होतात. कंपाऊंड पुरुष आणि मिश्र सांघिक चॅलेंज स्पर्धा मोठ्या पराभवानंतर संपल्या. अभिषेक वर्मा, ओजस देवतळे आणि प्रथमेश जावकर यांचा समावेश असलेल्या पुरुष संघाला उपांत्यपूर्व फेरीत नेदरलँड्सकडून 230-235 असा पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे, मिश्र प्रकारात देवतळे आणि ज्योती सुरेखा यांचा उपांत्यपूर्व फेरीत USA कडून 154-153 असा पराभव झाला. पॅरिस ऑलिम्पिक पात्रता फेरीची पुढील फेरी कॉन्टिनेन्टल गेम्स असेल. भारतासाठी, ऑक्टोबरमध्ये हांगझोऊ एशियाड असेल ज्यामध्ये मिश्र सांघिक चॅम्पियन आणि पुरुष आणि महिला प्रत्येकी एक खेळाडू निवडला जाईल. नोव्हेंबरमध्ये बँकॉकमध्ये होणारी आशियाई चॅम्पियनशिप आणि पुढील वर्षी जूनमध्ये होणारी अंतल्या विश्वचषक या शेवटच्या दोन पात्रता स्पर्धा आहेत.

# स्लो ओव्हर रेटसाठी भारत-इंडिजला दंड

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

3 ऑगस्ट रोजी त्रिनिदाद येथे झालेल्या पहिल्या T20 सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिजला स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला आहे. स्लो ओव्हर रेटमुळे भारताला मॅच फीच्या 5 टक्के दंड ठोठावण्यात आला. त्याचबरोबर वेस्ट इंडिजला किमान ओव्हर रेटपेक्षा 2 षटके कमी केल्याबद्दल 10 टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. एमिरेट्स आयसीसी एलिट पॅनल ऑफ मॅच रेफ्रीचे रिची रिचर्डसन यांनी दोन्ही कर्णधारांना अनुक्रमे एक आणि दोन षटके कमी असल्याने शिक्षा दिली. ICC आचारसंहितेच्या कलम 2.22 नुसार, प्रत्येक षटक दिलेल्या वेळेपेक्षा जास्त केल्यास 5 टक्के दंड आकारला जाईल.

हे 50 टक्क्यांपर्यंत लागू आहे. यापेक्षा जास्त दंड आकारला जाऊ शकत नाही. दोन्ही संघांचे कर्णधार हार्दिक पांड्या आणि रोवमन पॉवेल हे संथ षटकांसाठी दोषी आढळले आणि त्यांनी दंडही स्वीकारला. मैदानावरील पंच ग्रेगरी ब्रॅथवेट आणि



पॅट्रिक गुस्टार्ड, तर तिसरे पंच निगेल डुगुइड आणि चौथे पंच लेस्ली रेफर यांनी स्लो ओव्हर रेटचा दंड ठोठावला. मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजने भारतीय संघाचा 4 धावांनी पराभव केला.

शेवटच्या 30 चेंडूत संघाला 37 धावा करता आल्या नाहीत. या पराभवानंतर हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील संघ 5 सामन्यांच्या मालिकेत 1-0 ने पिछाडीवर गेला. या मालिकेतील पुढील सामना 6 ऑगस्ट रोजी गयाना येथील प्रॉव्हिडन्स स्टेडियमवर होणार आहे.

पोर्ट ऑफ स्पेनमध्ये नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने 20 षटकांत 6 बाद 149 धावा केल्या. प्रत्युत्तरात टीम इंडियाला 9 विकेट्सवर 145 धावाच करता आल्या. वेगवान गोलंदाज जेसन होल्डर सामनावीर ठरला. त्याने 19 धावांत 2 बळी घेतले.